# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०९/०७/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत १४ कि. मी. अंतरावरील मौजा कळमेश्वर ते उपरवाही रोड उपरवाही गावाजवळ येथे दिनांक २७/०६/२२ चे ११.३० वा. सुमारास मृतक व आरोपी हे एमएच— ४०/एएस— ०६११ क्रमांकाच्या डिस्कव्हर मोटरसायकलवर बसुन कळमेश्वर वरुन उपरवाही येथे गावाला परत जात असता उपरावही गावाजवळ आरोपी याचे ताब्यातील एमएच— ४०/एएस— ०६११ डिस्कव्हर मोटरसायकल ही भरधाव वेगाने व निष्काळजाणे चालवुन स्वता मोटरसायकल स्लीप होवुन मृतक व आरोपी हे दोघेही खाली पडुन जखमी झाले. त्यांना उपचाराकामी प्रथम ग्रामीण रुग्णालय कळमेश्वर व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता उपचारादरम्यान शंकरराव बळीराम कपाटे (मृतक), वय ६५ वर्ष, रा. उपरवाही हा मरण पावला. पो.स्टे. कळमेश्वर येथे ००.२२ कलम १७४ जाफौ ची मर्ग डायरी पो.स्टे. कळमेश्वर प्राप्त झाल्याने मर्ग क्रं. ५०/२२ कलम १७४ जा फौ अन्वये मर्ग दाखल करण्यात आला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक प्रदीप गायकवाड पो.स्टे. कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार हिवरकर मो.क्र. ९८८१५९५९९९ हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा ब्राम्हणी येथे याने दि २४/०७/२०२२ चे २०.३० वा. सुमारास **बाळु गंगाराम नागपुरे, वय (मृतक), वय ४५ वर्ष रा. ब्राम्हणी ता. उमरेड** यांनी आपल्या राहत्या घरी मौजा ब्राम्हणी येथे अज्ञात कारनावरुन विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे त्यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचारकरिता प्रथम ग्रामीण रुग्णालय उमरेड व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यास तपासुन दि. ०५/०७/२२ चे ०२.३० वा. मृत घोषित केले. मृतकाचे कागदपत्र प्राप्त झाल्याने मर्ग दाखल करुन चौकशित घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस विकास बेलसरे मेडीकल पोलिस बुथ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक राहुल घोंडे मो.नं ९२८४८७१५५७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर